श्री. व्यंकटेश महाविद्यालयाचे  आंतर-महाविद्यालयीन स्पर्धेमध्ये घवघवीत यश

"विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबर अभ्यासक्रमपूरक उपक्रमाकडे देखील आपल्या व्यक्तिमत्व विकासासाठी लक्ष देणे गरजेचे आहे. यामधून एक चांगला नागरिक व उत्तम व्यक्तिमत्त्व बनण्यास मदत होते .म्हणून महाविद्यालयातून सतत अभ्यासपूरक उपक्रमासाठी विद्यार्थ्यांना चालना दिली जाते." असे प्रतिपादन डॉ. व्ही. ए. माने यांनी केले. ते बी.बी.ए. विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाच्या सत्कार कार्यक्रम प्रसंगी बोलत होते. आंतर-महाविद्यालयीन घेण्यात आलेल्या विविध ठिकाणच्या स्पर्धेमध्ये महाविद्यालयातील बीबीए विभागाने उत्तुंग यश प्राप्त केले. यामध्ये राजाराम इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (आरआयटी), इस्लामपूर येथील "INSPIRA 2K23" मधील जाहिरात स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक पायल भैसोरा, रिया तापडिया , राधिका जोशी , विश्वनाथ नाईक या ग्रुपने पटकावला. तर जाहिरात स्पर्धेमध्येच द्वितीय क्रमांक क्षीरसागर सृष्टी, पाटील सानिका, केरिपाळे प्रणाली, हुद्देमनी प्रथमेश या ग्रुपने मिळविला. तसेच पोस्टर सादरीकरण स्पर्धेमध्ये सृष्टी उळागडे व भावना जनमाने या ग्रुपने पटकाविला. त्यानंतर भारती विद्यापीठ, (IMRDA), सांगली येथे घेण्यात आलेल्या "टेक्नोक्रॅकर 2023 " स्पर्धेमधील  अॅिड-मॅड शो मध्ये पायल भैसोरा , रिया तापडिया ,राधिका जोशी, विश्वनाथ नाईक यांनी प्रथम क्रमांक पटकाविला. त्यानंतर डी.वाय.पाटील टेक्निकल कॅम्पस, तळसांडे येथे घेण्यात आलेल्या "क्वांटम 2k23" या स्पर्धेमध्ये घेण्यात आलेल्या अॅतड-मॅड शो मध्ये पायल भैसोरा , रिया तापडिया , राधिका जोशी, विश्वनाथ नाईक या ग्रुपने प्रथम क्रमांक मिळविला. त्यानंतर कर्मवीर भाऊराव पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज अँड रिसर्च वर्ये, सातारा येथे घेण्यात आलेल्या "eMBARk 2023" या स्पर्धेमधील बिझनेस आयडिया या स्पर्धेमध्ये स्नेहा पारीक या विद्यार्थिनींने द्वितीय क्रमांक प्राप्त केला.तसेच अॅसड-मॅड शो मध्ये पायल भैसोरा, रिया तापडिया, राधिका जोशी, विश्वनाथ नाईक या ग्रुपने द्वितीय क्रमांक व ट्रेझर हंट या स्पर्धेमध्ये चिउलकर प्रणव , दीपक शिंदे  यांनी द्वितीय क्रमांक पटकाविला. त्यानंतर एम.बी.ए. युनिट वाणिज्य आणि व्यवस्थापन विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे घेण्यात आलेल्या सिंहावलोकन 2023' या स्पर्धेमधील व्यवसाय योजना (चातुर्य) स्पर्धेमध्ये स्नेहा . व्ही. पारीक या विद्यार्थिनींनी प्रथम क्रमांक तर पोस्टर सादरीकरण या स्पर्धेत सृष्टी उलगडे ,भावना जनमाने या विद्यार्थिनींनी प्रथम क्रमांक पटकाविला. त्यानंतर चिंतामणराव इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट डेव्हलपमेंट अँड रिसर्च, सांगली येथे घेण्यात आलेल्या 'पहल 2023' या स्पर्धेमधील अॅनड-मॅड शो स्पर्धेमध्ये पायल भैसोरा , रिया तापडिया, राधिका जोशी या विद्यार्थिनींनी द्वितीय क्रमांक पटकाविला. या सर्व स्पर्धांमधील सहभागाबाबत विद्यार्थ्यांना श्री व्यंकटेश महाविद्यालयाचे प्राचार्य व बी.बी.ए. विभागाच्या समन्वयक प्राध्यापिका पी.पी.दाइंगडे व इतर प्राध्यापक वर्गाचे मार्गदर्शन लाभले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. ए. माने यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे सत्कार व कौतुकास्पद अभिनंदन केले. स्पर्धेमध्ये सहभागी विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्र, रोख बक्षीस व पदक देण्यात आले व त्यांचा गौरव करण्यात आला. महाविद्यालयाच्या यशाची परंपरा कायम राखत विद्यार्थ्यांनी आणखीन एक मानाचा तुरा रोवला.


PRINCIPAL